## प्रेस नोट

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०१.०४.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १.विलास रतन डेडूंले, वय ३७ वर्षे, पद – स्वास्थ निरीक्षक, मनपा.अमरावती रा.महाराष्ट्र बॅक कॉलनी, साई नगर अमरावती.<br>२.तिलक विनोद ढेंडवाल, वय ३४ वर्षे, पद – सफाई कामगार मनपा.अमरावती रा. औरंगपूरा, अंबागेट, अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०१/०४/२०२२ चे ११.४५ ते १२.२० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ३०००/– प्रति महीना |
| ५ | तडजोडी अंती मागणी केलेली लाच रक्कम | २०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | २०००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | अमरावती महानगरपालीका चे गेट समोर |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी महानगरपालीका अमरावती येथील स्वास्थ निरीक्षक श्री.विलास डेडूंले यांनी तक्रारदार त्याचे इतवारा बाजार येथील दुकानात कापडयाच्या थैल्या विकण्याकरीता व दुकान चालविण्याकरीता ३०००/– रुपये प्रति महीना लाचेची मागणी आहे असल्याबाबत दिनांक २८.०३.२०२२ रोजी तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.३०/०३/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान स्वास्थ निरीक्षक श्री.विलास डेडूंले यांनी तक्रारदार त्याचे इतवारा बाजार येथील दुकानात कापडयाच्या थैल्या विकण्याकरीता व दुकान चालविण्याकरीता ३०००/– रुपये प्रति महीना लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २०००/– रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दिनांक ०१/०४/२०२२ आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र.१ श्री.विलास डेंडूले, स्वास्थ निरीक्षक यांनी यातील आलोसे क्र.२ श्री.तिलक ढेंडवाल यांना सोबत घेवून आले व तक्रारदार यांना बोलावून पंचासमक्ष आलोसे क्र.२ यांना लाच रक्कम देण्यास सांगीतले. त्यावेळी आलोसे क्र.१ श्री.विलास डेडूंले समक्ष हजर असतांना आलोसे क्र.२ श्री.तिलक ढेंडवाल यांनी तक्रारदार यांचेकडून,२०००/–रु. तक्रारदार यांचे इतवारा बाजार येथील दुकानात कापडयाच्या थैल्या विकण्याकरीता व दुकान चालविण्याकरीता लाच रक्कम स्विकारल्याने दोन्ही आरोपीतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुद आरोपींविरुध्द पो.स्टे.सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, व श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पो.नि.सतीश उमरे, पो.नि.अमोल कडु, पो.ना. युवराज राठोड, निलेश महिंगे, चासफौ.सतिश किटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,
टोल फ्रि नंबर – १०६४

(सतीश उमरे)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner